सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पोलीस उप आयुक्त कार्यालय, उत्तर परिमंडळ —२
Dep+uty Commissioner of Police, North Zone – 2
Deputy Commissioner of Police, Zone-XI, Borivali Police Station, 2nd Floor,
S.V. Road, Borivali (W), Mumbai 400092.
Phone No.: 28903899, E-mail : dcpzone11-mum@mahapolice.gov.in

प्रेस नोट **दि.०९/११/२०२६**

<u>उत्तर परिमंडळ २ मधील पोलीस ठाणे अंतर्गत दाखल गुन्हयांतील १,१७,५०,४०१/- रुपयांचा (एक कोटी सतरा लाख पन्नास हजार चारशे एक रुपये) हस्तगत मुददेमाल मुळ मालक यांना वितरित केल्याबाबत</u>

बृन्हमुंबई पोलिस आयुक्तालय, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई मधील उत्तर परिमंडळ २ अंतर्गत पोलीस ठाणे हहदीत गुन्हयास प्रतिबंध व दाखल गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेणे,त्याचप्रमाणे नागरिकांची सुरक्षितता व सेवेचा भाग म्हणून, दिपावली सणाच्या निमीत्ताने उत्तर परिमंडळ-२ अंतर्गत येणाऱ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दाखल गुन्ह्यांमध्ये तपासादरम्यान हस्तगत करण्यात आलेले सोन्याचे दागिने, मोबाईल फोन, मोटार वाहने आणि रोख रक्कम इत्यादी मालमत्ता कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन आज दिनांक ०९/११/२०२६ रोजी मा.श्री. शशिकुमार मीना, अपर पोलीस आयुक्त ,उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई यांचे हस्ते फिर्यादींना छत्रपती संभाजी राजे सभागृह,बोरीवली पोलीस ठाणे,मुंबई येथे आयोजित केलेल्या भव्य कार्यक्रमात सन्मानाने परत करण्यात आली.

परत करण्यात आलेल्या मुददेमालाचे वर्णन:-

१) सोने व दागिने:- उत्तर परिमंडळ -२ अंतर्गत येणाऱ्या पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयातील रू. ७९,१०,०००/-(एकोणऐंशी लाख दहा हजार) किंमतीचे मुल्यमापन केलेले ५६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने. (चारकोप -४३५ ग्रॅम, कांदिवली - २५ ग्रॅम, एम.एच.बी.कॉलनी - ९७ ग्रॅम, गोराई -०३ ग्रॅम,)

२) मोबाईल फोन:- उत्तर परिमंडळ -२ अंतर्गत येणाऱ्या पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयातील व सीईआयआर पोर्टल मार्फत हस्तगत एकुण रू. २८,४०,०००/- अट्ठावीस लाख चाळीस हजार रूपये) किंमतीचे विविध कंपनीचे एकूण **२८४** मोबाईल फोन. (मालवणी - ८७, चारकोप -५५, कांदिवली -५०, बोरीवली - ५०,एम.एच. बी.कॉलनी - ४२,)

३) रोख रक्कम व ऑनलाईन तक्रारींची रक्कम: - रू. ०७,९०,४०१/- (सात लाख नव्वद हजार चारशे एक रूपये) त्यामध्ये रोख रक्कम रू. ८३,०००/- व एनसीआरपी पोर्टल ऑनलाईन तक्रारी व सायबर गुन्हयांमधील मधील ०७,०७,४०१/- रूपये (चारकोप-०५,०००००/-रूपये,कांदिवली- ०२,०७,४०१/- रूपये, एम.एच.बी. कॉलनी -८३,०००/- रूपये)

४) मोटार वाहने:-रू. २,१०,०००/-(दोन लाख दहा हजार) किंमतीच्या एकूण ०५ दुचाकी मोटर सायकल (बोरीवली -२, एम.एच.बी.कॉलनी -३)

उत्तर परिमंडळ -२, मुंबई अंतर्गत पोलीस ठाण्यांतील अधिकारी व अंमलदार यांनी उत्कृष्ट कामगिरी करत वेगवेगळया गुन्हयातील रू.१,१७,५०,४०१/- (एक कोटी सतरा लाख पन्नास हजार चारशे एक रुपये) ची मालमत्ता हस्तगत केली आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृन्हमुंबई, मा. श्री. मनोजकुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त (का. व सु.), मा. श्री. शशिकुमार मीना, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री. संदीप घुगे, पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-२, मा. श्री. संतोष धनवटे, सहाय्यक पोलीस आयुक्त, बोरीवली विभाग, मुंबई, मा. श्री. महेशकुमार ठाकुर, सहाय्यक पोलीस आयुक्त, मालवणी विभाग, मुंबई, मा. श्री. सुधाकर ह्युंबे, सहाय्यक, पोलीस आयुक्त, गोराई विभाग, मुंबई तसेच सर्व पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोनि (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी, सायबर गुन्हे प्रकटीकटीकरण अधिकारी, इतर अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

.....